**FORM A**

**Public Announcement**

(Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016

# FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF KARRM INFRASTRUCTURE PVT. LTD.

| RELEVANT PARTICULARS | | |
|---|---|---|
| 1. | Name of corporate debtor | Karrm Infrastructure Private Limited |
| 2. | Date of incorporation of corporate debtor | June 27, 2011 |
| 3. | Authority under which corporate debtor is incorporated / registered | Registrar of Companies - Mumbai |
| 4. | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U45200MH2011PTC219128 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | **Registered Address:** Shop No. L-261, Lower Ground Floor, Dreams- The Mall, Near LBS Marg, Bhandup, West, Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400078 |
| 6. | Insolvency commencement date in respect of corporate debtor | February 29, 2024 (Date of Hon'ble NCLT order) (*March 02, 2024, Date of receipt of order by IRP) |
| 7. | Estimated date of closure of insolvency resolution process | August 29, 2024 |
| 8. | Name and registration number of the insolvency professional acting as interim resolution professional | **Name:** Mr. Arun Kapoor<br>**Regn No:** IBBI/IPA-003/IP-N00030/2017-18/10230 |
| 9. | Address and e-mail of the interim resolution professional, as registered with the Board | **Registered Address:** G-601, Army Co-operative Housing Society, Sector- 09, Nerul (East), Navi Mumbai, Maharashtra – 400706<br>**Email Id:** arun.kapoor58@yahoo.in |
| 10. | Address and e-mail to be used for correspondence with the interim resolution professional | **Process Specific Address**: Arun Kapoor c/o Ancoraa Resolution Private Limited, 1412, 14th Floor, Real Tech Park, Sector 30 A, Vashi, Navi Mumbai - 400 703.<br>**Process Specific Email Id:** cirp.karrmipl@ancoraa.com |
| 11. | Last date for submission of claims | March 16, 2024 |
| 12. | Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21, ascertained by the interim resolution professional (IRP) | Homebuyers |
| 13. | Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class) | 1. Atul Narayan Naik (IBBI/IPA-003/ICAI-N-0385/2021-2022/14011)<br>2. Sabbani Maruthi (IBBI/IPA-001/IP-P-02752/2022-2023/14202)<br>3. Anil Kashi Drolia (IBBI/IPA-001/IP-P-02327/2020-2021/13482) |
| 14. | (a) Relevant Forms and<br>(b) Details of authorized representatives are available at: | Web link: https://ibbi.gov.in/home/downloads<br>Physical Address: https://ibbi.gov.in/en/insolvency-professional |

Notice is hereby given that the National Company Law Tribunal, Mumbai Bench -II has ordered the commencement of a corporate insolvency resolution process of the Karrm Infrastructure Private Limited on February 29, 2024, vide order no. CP (IB) No. 651/MB/2023. (Date of receipt of order by Interim Resolution Professional is March 02, 2024).

The creditors of Karrm Infrastructure Private Limited are hereby called upon to submit their claims with proof on or before March 16, 2024, to the Interim Resolution Professional at the address mentioned in entry No. 10.

The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.

*Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.*

ARUN KAPOOR Reg. No. IBBI/IPA-003/IP-N00030/2017-2018/10230 INSOLVENCY PROFESSIONAL

**Arun Kapoor**
**Interim Resolution Professional**
**In the matter of Karrm Infrastructure Private Limited**
**IBBI Regn. No.** IBBI/IPA-003/IP-N00030/2017-18/10230

**Date: March 5, 2024**
**Place: Navi Mumbai**

निवडक महाराष्ट्र

## नगरोत्थानमधून वेंगुर्ल्यासाठी ४ कोटी १९ लाख निधी

**वेंगुर्ला :** भाजप नेते तथा सिंधुदूर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या माध्यमातून वेंगुर्ला शहरातील तब्बल ३० कामांना नगरोत्थानमधून ४ कोटी १९ लाख रूपये निधी मंजूर झाला आहे. या कामांना जिल्हा प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. लोकसभेची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी या सर्व कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे अशी माहिती भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रसन्ना देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिली. वेंगुर्ला भाजप तालुका कार्यालयात पत्रकार परिषदेला त्यांच्या सोबत तालुका अध्यक्ष सुहास गावंडळकर, जिल्हा नियोजन समिती सदस्य दिलीप गिरप, बाबली वायंगणकर, पशांत आपटे, साईप्रसाद नाईक, रवी शिरसाट, बाळू प्रभू, प्रणव वायंगणकर आदी उपस्थित होते.

## जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**वसई :** जागतिक महिला दिनानिमित्त बहुजन विकास आघाडीच्या नवघर माणिकपूर विभागातर्फे "स्त्री शक्तीचा सोहळा" या कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार दि. ९ मार्च २०२४ सायं. ४ ते ७ या वेळेत साईनगर मैदान, नवघर, वसई (प.) येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून प्रथम महिला महापौर सौ. प्रविणा हितेंद्र ठाकूर या उपस्थित राहणार आहेत. 'स्त्री शक्तीचा सोहळा' या कार्यक्रमात भजनसंध्या , योगासन प्रात्यक्षिके, दहीहंडी प्रात्यक्षिके, 'विविधता में एकता' नृत्याविष्कार, गंमतीदार - उत्साहवर्धक खेळ या कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेस उपयुक्त आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे, तर प्रथम क्रमांक विजेती व उपविजेती महिलेस पैठणी देण्यात येणार आहे. अधिक माहितीकरीता माजी नगरसेविका मनीषा जाधव, माजी नगराध्यक्षा राजेश्वरी नारायण, मीरा पाटील, प्रमिला पाटील, माया तळेकर, पुष्पा जाधव, भारती ठाकूर, गीता मानकर, किरण बडे, गीता आयरे, वंदना पाटील, निभा मोदी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गंभीर गुन्ह्यात ९ वर्षे फरार असलेल्या आरोपीस अटक

**कराड :** सातारा, सांगली जिल्ह्यात घरफोडी, चोऱ्या सारखे गंभीर गुन्हे करून ९ वर्षे फरार असणाऱ्या आरोपीस कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने शनिवारी रात्री कराड परिसरातून अटक केली. दिपक महादेव थोरात असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. कराड शहर पोलीस ठाणे हद्दीत सन २०१५ साली विद्यानगर येथील संजय तुकाराम देसाई यांच्या घरात दोन अज्ञात व्यक्तीनी कळकाच्या काठीस सुफली बांधून घरातील मोबाईल फोन मुद्दाम लबाडीने चोरुन नेला होता. याबाबत कराड शहर पोलिसात गुन्हा नोंद होता. सदर गुन्ह्यामध्ये आरोपी आनंदा भिकाजी थोरात व दिपक महादेव थोरात यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. दरम्यान, सदर गुन्ह्यात आरोपीत दिपक महादेव थोरात हा गुन्हा केल्यापासून सुमारे ९ वर्षे पोलिसांना गुंगारा देत होता.

## पेण विद्युत मंडळाचा लाईनमन दिन साजरा

**पेण :** देशभरात विद्युत मंडळाचा लाईनमन दिन साजरा होत असतानाच सोमवारी पेण विद्युत मंडळाच्या वतीने देखील हा दिन साजरा करण्यात आला. लाईनमन दिन साजरा करत असताना विद्युत मंडळाच्या लाईनमनने शहरातून रॅली काढली होती. यावेळी बोलताना पेण विद्युत मंडळ कार्यालयाचे अधिक्षक अभियंता इब्राहिम मुलाणी यांनी उपस्थित लाईनमनना मार्गदर्शन करताना "आपला लाईनमन म्हणजे प्रत्येक ग्राहकाच्या घरामधे विद्युत पुरवठा करून ते घर प्रकाशमय करणारा देवदूत आहे" अशा प्रकारची स्तुतीसुमने वाहिली.

# विद्यापीठांना वंचितांपर्यंत पोहचावे लागेल

## राज्यपाल रमेश बैस : 'इंडिया @ २०४७' राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**पुणे :** अद्यापही ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत, त्यामुळे खासगी तसेच सरकारी विद्यापीठांनी या शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांपर्यंत पोहचायला हवे, असे मत महाराष्ट्राचे राज्यापाल रमेश बैस यांनी मांडले.

एज्युकेशन प्रमोशन सोसायटी फॉर इंडिया (ईपीएसआय) तर्फे आयोजित 'इंडिया @ २०४७ : विकसित भारतासाठी उच्च शिक्षणाची भूमिका', या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. याप्रसंगी, ईपीएसआयचे अध्यक्ष तथा रामाय्या विद्यापीठ बंगळुरूचे कुलपती डॉ. एम. आर. जयराम, वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संस्थापक कुलपती डॉ. जी. विश्वनाथन, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट अँड कॉमर्सचे डॉ. एच. चतुर्वेदी, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन उपाध्यक्ष डॉ. अभय जेरे, मानव रचना शिक्षण संस्थेचे डॉ. प्रशांत भल्ला आदी या प्रसंगी उपस्थित होते.

राज्यपाल बैस पुढे म्हणाले, "ग्रामीण भागातील विद्यार्थी खासकरून मुली आजही उच्चशिक्षणापासून वंचित राहतात. त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणायला हवे. शिक्षणातील लैंगिक समानतेला चालना देण्यासाठी एलजीबीटीक्यू समुदायालाही चांगले शिक्षण द्यायला हवे. पूर्वी लोक केवळ नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण घ्यायचे, आता मात्र परिस्थिती बदलली असून एआयसारख्या तंत्रज्ञानामुळे पालकांचा कौशल्याधिष्ठीत शिक्षणाकडे ओढा वाढला आहे. त्यामुळे विकसित भारताच्या वाटचालीत सरकारीसह खासगी विद्यापीठांचा वाटाही मोठा असणार आहे, असेही ते पुढे म्हणाले. तसेच यासह कारागृहातील कैद्यांना देखील शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे."



### बाबूनीतीचे शिक्षण आता नको

इंग्रजांनी भारतीयांना केवळ बाबू बनविण्याचे शिक्षण दिले. त्यामुळे अशाप्रकारचे बाबूनीतीचे शिक्षण आता टाळायला हवे. आता आपल्या राष्ट्रभाषेचा अभिमान बाळगून त्याच भाषेतील शिक्षणाला प्रोत्साहन द्यायला हवे. त्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांचीही मानसिकता बदलावी लागेल. कारण जर्मन भाषेत शिक्षण दिले जाऊ शकत असेल तर हिंदीमध्ये का नाही, असा प्रश्नही त्यांनी यावेळी विचारला. तसेच, यूपीएससीने प्रादेशिक भाषेत पेपर देण्याची मुभा दिल्यानंतर हिंदी भाषिक विद्यार्थ्यांचा या परीक्षेतील टक्का वाढल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

ईपीएसआयचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. कराड म्हणाले की, "भारताला विकसित करण्यासाठी शिक्षण क्षेत्राची अत्यंत महत्वाची भूमिका असणार आहे. युवकांचा देश अशी भारताची ओळख आहे. त्यामुळे ही युवा शक्तीच खऱ्याअर्थाने देशाच्या विकसित होण्यात मोठा हातभार लावणार आहे. सध्या या युवकांना घडविण्याचे काम भारतातील सरकारी व खासगी विद्यापीठे करत आहेत. त्यामुळे विकसित भारताकडे वाटचाल करत असताना ही विद्यापीठेही विकसित होणे व त्यांच्यामाध्यमाधून विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा पुरवणेही तितकेच आवश्यक आहे.

## रेल्वे उशिराने धावत असल्याने नांदेडकर प्रवाशांचे हाल

**नांदेड :** नांदेड रेल्वे विभागातील रेल्वे ट्रॅकच्या देखरेख, दुरुस्तीकरिता रोलिंग कॉरिडोर ब्लॉक घेण्यात आला आहे. यामुळे नांदेड-मनमाड-नांदेड एक्स्प्रेस काही दिवस अंशतः रद्द करण्यात आली आहे. त्यातच मागील आठ दिवसांपासून सचखंड एक्स्प्रेस उशिराने धावत असल्याने नांदेडकर प्रवाशांचे हाल होत आहेत.

दक्षिण मध्य रेल्वे विभागात मागील काही दिवसांपासून विद्युतीकरणाचे काम जलद गतीने सुरू आहेत. त्यात काही मार्गावर ट्रॅक दुरुस्तीचेही काम हाती घेण्यात आले आहे. याचा परिणाम रेल्वेच्या वेळापत्रकावर झाला असून, उशिराने धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांना कित्येक वेळ ताटकळत राहावे लागत आहे. बरेच जण अर्ध्यातूनच खासगी वाहनाचा आधार घेत आहेत. जवळपास महिनाभर ही कामे सुरू राहणार असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला तोंड द्यावे लागणार आहे. तसेच मागील आठ दिवसांपासून अमृतसर येथून येणाऱ्या सचखंड एक्स्प्रेसला नांदेडला येण्यास फार उशीर होत आहे. त्यामुळे नांदेडवरून जाणारी एक्स्प्रेस सहा ते सात तास उशिराने धावत आहे.

गावकऱ्यांनी मिठाईच्या दुकानावर धडक देत फेकून दिले साहित्य

# मिठाईच्या दुकानात पायाने पीठ तुडवताना व्हिडिओ व्हायरल




**उल्हासनगर :** एका मिठाईच्या दुकानात कारागीर पायाने सामोसे बनवण्यासाठीची पीठ तुडवीत असल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या घटनेनंतर चिडलेल्या गावकऱ्यांनी दुकानावर धडक देत संबंधित तळलेले पदार्थ विकण्यावर दुकानदारावर बंदी आणली आहे. तसेच गावकऱ्यांनी त्या मिठाईच्या दुकानावर धडक देत दुकानातील साहित्य दुकानदाराला फेकून देण्यास भाग पाडले.

उल्हासनगर कॅम्प ४ च्या आशेळेगाव प्रवेशद्वारावर हरिओम स्वीट नावाचे गेल्या १५ वर्षांपासून दुकान आहे. या मिठाईच्या दुकानात समोसे, कचोरी, वडापाव, ढोकला आदी खाद्यपदार्थ विक्रीसाठी असतात. जवळपास पंधरा ते वीस हजार लोकसंख्या असलेल्या गावाच्या वेशीवर हे एकमेव गोड पदार्थ विकणारे दुकान असल्याने अख्खे आशळे गाव या दुकानातून मिठाईची खरेदी करते. काल समाज माध्यमांवर या दुकानात एक कारागीर समोसे बनविण्यासाठी पायाने पीठ तुडवत असल्याचा व्हिडिओ वायरल झाला होता. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण होते.

या प्रकरणी अन्न औषध प्रशासनाने गंभीर दखल घेत योग्य ती कारवाई करावी अशी मागणी आशेळेच्या गावकऱ्यांनी केली आहे. मागील १५ वर्षांपासून हे स्वीट मार्ट असून, अनेक गावकरी याच दुकानातून मिठाई खरेदी करत होते; मात्र या दुकानदाराने गावकऱ्यांची फसवणूक केली आहे. आता हे दुकान या ठिकाणी चालू देणार नाही, असा देखील पवित्रा गावकऱ्यांनी घेतला आहे.

# पंतप्रधान मोदींशी अशोक चव्हाण यांचे हितगुज

**प्रतिनिधी/नांदेड :**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा नवनिर्वाचित राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांनी सोमवारी (दि. ४) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी हितगुज साधून नांदेड जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती व निवडणूक तयारीवर चर्चा केली आहे.

पाच राज्यांच्या तीन दिवसीय दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आदिलाबादहून नांदेडमार्गे चेन्नईला जात असताना सुमारे १५ मिनिटे नांदेड येथील श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळावर थांबले होते. यावेळी जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी, भाजपचे पदाधिकारी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. यामध्ये नुकतेच भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या अशोक चव्हाणांचाही समावेश होता. स्वागत स्वीकारताना पंतप्रधानांनी काही मिनिटे थांबून चव्हाणांशी छोटेखानी संवाद साधला. यावेळी उभय नेत्यांनी एकमेकांचा हात हातात घेतलेले एक छायाचित्र दुपारनंतर सोशल मीडियावर वेगाने फिरले. विमानतळावरून बाहेर पडताना चव्हाणांनी या भेटीबाबत प्रसारमाध्यमांना माहिती दिली.

ते म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने मला राज्यसभेची संधी दिल्याबद्दल मी पंतप्रधानांचे आभार मानले. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्याचे वर्तमान राजकीय चित्र आणि आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा झाली. मी लवकरच त्यांना पुन्हा भेटणार असल्याचे सूतोवाचही अशोक चव्हाण यांनी यावेळी केले.


### जाहीर सूचना

तिगमांशु को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., अशोक चक्रवर्ती रोडलगत, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४००१०१ च्या सदस्य श्रीम. वर्षा किर्तीकुमार शाह यांनी असे कळविले आहे कि, सोसायटीच्या इमारतीमधील त्यांच्या फ्लॅट क्र. ५ए च्या संदर्भातील नामाधिकारांचे मूळ दस्तावेज तसेच विभीन्न क्र. ३१ ते ३५ धारक पाच शेअर्सकरिता दिनांक २६ जुलै, १९८६ रोजीचे मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. ०७ हे वाळवीमुळे नष्ट झाले आहे. सदर सोसायटी त्यांना प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यास प्रस्तावित आहे. सदर सोसायटी त्यांना प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्याविरोधात दावे आणि आक्षेप जर काही असल्यास ते मागवित आहे. ते सदर सोसायटीचे सन्मा. सचिव किंवा श्री. पी. सी. थॉमस, वकील, शॉप क्र. १०ए, एस्टी अपार्टमेंटस, साईबाबा नगर, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२ यांच्या कार्यालयात १४ दिवसांच्या आत पृष्ठ्यर्थ कागदपत्रांसह दाखल करावेत, कसूर केल्यास, आवश्यक ते करण्यात येईल.

सही/-
(पी. सी. थॉमस)
वकील उच्च न्यायालय
ठिकाण: मुंबई
दिनांक : ०४.०३.२०२४

### जाहीर सूचना सोने लिलाव

सर्वसाधारण जनता आणि विशेषतः खाते धारकांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील नमूद खात्यामधील तारण सोने दागिण्यांचा ई-लिलाव हा **दि फेडरल बँक लि.** द्वारे, १५.०३.२०२४ रोजीस ऑनलाईन पोर्टल http://gold.samil.in मार्फत केला जाईल. इच्छुक खरेदीदारांनी पुढील महितीकरिता लिलाव पोर्टलवर लॉग ऑन करावे किंवा २८४६३०८३, २८४६२६०७ वर बँकेकडे संपर्क करावा. जर तारण दागिण्यांच्या कोणत्याही किंवा सर्व वस्तुंच्या संदर्भात वरील नमूद तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव हा पूर्ण होऊ शकला नाही, तर बँक पुढील सूचनेशिवाय पुढील कोणत्याही तारखेस वस्तूंचा खाजगी लिलाव आयोजीत करेल.

**सोने कर्ज खाते क्रमांक**

| खाते क्रमांक | खाते नाव |
|---|---|
| १६२२६४००००८४०८ | केतन मारुती अंबोलकर |
| १६२२६४००००८४९९ | रेणू पांडे |
| १६२२६१००२१४३८९ | कबिता हेमंत शर्मा |
| १६२२६१००२१४९१८ | आलीकल शशीकुमार |

ठिकाण: कांदिवली (पू)
दिनांक: ०४.०३.२०२४
FEDERAL BANK YOUR PERFECT BANKING PARTNER
सही/-
प्राधिकृत अधिकारी
द फेडरल बँक लि.करिता

### जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, **नग्गेट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** (''**सोसायटी**'') यांनी आमच्या अशिलाला खालील लिखित **परिशिष्टा**त अधिक सविस्तरपणे वर्णिलेल्या जमिनीच्या संदर्भातील विकास हक्क मंजूर केले आहेत.

कोणत्याही व्यक्तींना खालील लिखित परिशिष्टात वर्णिलेल्या जमिनीच्या संदर्भात किंवा त्याविरुद्ध विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, भेट, विश्वस्त, वारसा, कब्जा, भोगवटा, भाडेपट्टा, धारणाधिकार, कुळवहिवाट, परवाना, मार्गक्रमण हक्क, कंत्राट, सुविधाधिकार किंवा अन्य कसेहीच्या मार्गे कोणतेही दावे असल्यास तसे लिखित स्वरूपात दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ दस्तावेजी पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय ५०२/५०३, ५वा मजला, ''बी'' विंग, ३६ टर्नर रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५० येथे आणि ईमेल **staff@preceptlegal.in** आणि **flanian@preceptlegal.in** येथे स्कॅन प्रतींसमवेत या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, दावे किंवा आक्षेप जर काही असल्यास ते त्यागित आणि/किंवा सोडून दिल्याचे समजले जातील.

**परिशिष्ट**

६२, चित्रकार धुरंधर मार्ग, १८ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ स्थित सी.टी.एस. क्र. ई/२१ आणि एफ/२० धारक, खार उपनगर योजना ७ चा प्लॉट क्र. ५९८, ५७९, ५८० आणि ५९७ (भाग) धारक मोजमापित २७०८ चौ. यार्डस्, २२६४ चौ.मी.च्या समतुल्य पूर्ण मालकीची जमीन, आणि सीमाबध्दतेने खालीलप्रमाणे:-
उत्तरेला किंवा त्या दिशेने - प्लॉट क्र. ५८१, सी.टी.एस. क्र. ई/२२, प्लॉट क्र. ५९७ (भाग), सी.टी.एस. क्र. ई/२० (भाग) याद्वार;
दक्षिणेला किंवा त्या दिशेने - पहिला रस्ता याद्वारे;
पूर्वेला किंवा त्या दिशेने - १८ वा रस्ता याद्वारे; आणि
पश्चिमेला किंवा त्या दिशेने - १९ वा रस्ता याद्वारे
मुंबई दिनांकित ०५ मार्च. २०२४
मे. प्रिसेप्ट लिगल, ॲटव्होकेयस् करिता
**फ्लानियन डी'सोझा**
भागीदार

### जाहीर सूचना

श्री. जेराम रेवाचंद भाम्भानी हे श्री गणेश छाया को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., गणेश चौक, दिव्य गुंजन चारकोपजवळ, सेक्टर ३, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७ चे संयुक्त सदस्य तसेच फ्लॅट क्र. ५०३ आणि विभि. क्र. ०९१ ते ०९५ आई ०२५१ ते ०२५५ चे धारक असून त्यांचे ३१.३.२०१६ रोजीस निधन झाले. त्यांची दोन मुले श्री. राकेश जे. भाम्भानी आणि श्री. अनिल जे. भाम्भानी यांनी सोसायटीमधील त्यांच्या सदस्यत्वासाठी आणि सदर मयताच्या हक्क, नामाधिकार आणि हितसंबंधांच्या ५०% शेअर्सचे त्यांच्या नावे हस्तांतरण करावे यासाठी सोसायटीला अर्ज केला आहे. सदर सोसायटी प्रस्तावित हस्तांतरणाविरुद्ध दावे आणि आक्षेप जर काही असल्यास ते मागवित आहे. ते सदर सोसायटीचे सन्मा. सचिव किंवा श्री. पी. सी. थॉमस, वकील, शॉप क्र. १०ए, एस्टी अपार्टमेंटस, साईबाबा नगर, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२ यांच्या कार्यालयात १४ दिवसांच्या आत पृष्ठ्यर्थ कागदपत्रांसह दाखल करावेत, कसूर केल्यास, आवश्यक ते करण्यात येईल.

सही/-
(पी. सी. थॉमस)
वकील उच्च न्यायालय
ठिकाण: मुंबई
दिनांक : ०४.०३.२०२४

### केनरा बैंक Canara Bank

सिंडिकेट Syndicate

कॅनरा बँक, डोंबिवली पूर्व शाखा,
पत्ता: प्रियदर्शिनी बिल्डिंग, अंबिका हॉटेल समोर, फडके रोड, डोंबिवली (पूर्व),
ठाणे-४२१२०१ टेलि: (+०२५१) २४२०५७२/२४२०५५६ मोबाईल: ९८८५९६८७३९
ईमेल: cb15461@canarabank.com/canarabank.com
शाखा संदर्भ : १५४६१/सरफैसी/१६००००९२१०७४ दिनांक : २४.०२.२०२४

**कब्जा सूचना**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकर्ता हे **कॅनरा बँकेचे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने **सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट ५४ सन २००२)** आणि कलम १३(१२) सहवाचता **सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२** च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **१३.०९.२०२३ (१३ सप्टेंबर २०२३) रोजी मागणी सूचना** जारी करून रोजी कर्जदार **सौ. मधुरा महेश जाधव, फ्लॅट क्र.७०४, सातवा मजला, ए विंग-साज सृष्टी कॉम्प्लेक्स, कल्याण-शिल रोड, डायघर, ठाणे-४२१२०४ यांना सूचनेतील नमूद रक्कम रु. २५,०९,६०६.६५/- (रुपये पंचवीस लाख नऊ हजार सहाशे सहा आणि पासष्ठ पैसे मात्र)** च्यासह पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च, परिव्यय या रकमेची परतफेड सदर सूचना तारखेपासून **६० दिवसांत** करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे विशेषतः वरील नमूद कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद मिळकतीचा कब्जा त्यांना सदर ॲक्टच्या कलम १३ (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या **नियम ८ आणि ९** अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर दिनांक **२४ फेब्रुवारी २०२४** रोजी घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **कॅनरा बँक, डोंबिवली पूर्व २ शाखेच्या रु. २६,०७,७४७.६५/- (रुपये सव्वीस लाख सात हजार सातशे सत्तेचाळीस आणि पासष्ठ पैसे मात्र २३-फेब्रुवारी-२०२४ रोजीस)** आणि पुढील व्याजाच्या भाराअधीन राहील.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

फ्लॅट क्र.७०४, सातवा मजला, ए विंग-साज सृष्टी कॉम्प्लेक्स, कल्याण शिल रोड, डायघर, ठाणे-४२१२०४
मिळकती चे सीमाबद्ध:
उत्तर: डायघर रोड,
दक्षिण: अंतर्गत रस्ता आणि श्री गणेश कृपा बंगला,
पूर्व: अंतर्गत रस्ता आणि पाटील बंगला,
पश्चिम: बी विंग आणि ओपन स्पेस.
**दिनांक : २४.०२.२०२४** **प्राधिकृत अधिकारी,**
**ठिकाण : डोंबिवली पूर्व** **कॅनरा बँक**

### जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते कि, आम्ही कंपनीज ॲक्ट, १९५६ च्या तरतुदींतर्गत नोंदणीकृत पब्लिक लिमिटेड कंपनी अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लिमिटेड **(मालक)** ज्यांचे कार्यालय येथे अरिहंत ऑरा, २५वा मजला, बी-विंग, प्लॉट क्र. १३/१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, ठाणे बेलापूर रोड, तुर्भे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४००७०५ च्या स्थावर मिळकतींच्या संदर्भातील मालकी हक्क, नामाधिकार आणि इतर हक्कदारी यांच्या नामाधिकारांची तपासणी करत आहोत (यानंतर येथे खालील **परिशिष्टात** अधिक तपशीलवारपणे सदर **स्थावर मिळकत** असे उल्लेखित).

सदर मालक हे स्थावर मिळकतींवर निवासी प्रोजेक्ट **(प्रोजेक्ट)** विकसित आणि बांधत आहेत प्रोजेक्टस **(युनिट्स)** मधील स्थावर मिळकती आणि विक्री न झालेले युनिट्स हे प्रभारित आणि गहाण होण्यास प्रस्तावित आहेत आणि आमच्या अशिलांच्या नावे आर्थिक साहाय्य प्रदान करण्यासाठी मालकांद्वारे युनिट्सकडून प्राप्त होणार असलेले शुल्क हे भारित होण्यास प्रस्तावित आहेत.

सर्व व्यक्तीं समाविष्टीत वैयक्तिक, एक हिंदू अविभाजित कुटुंब, कंपनी (न्या), बँका, वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म्स, व्यक्तींचे मंडळ किंवा वैयक्तिक स्थापित असलेले किंवा नसलेले, धनको आणि/किंवा सावकार ज्यांना सदर स्थावर मिळकती आणि/किंवा युनिट्स किंवा त्यावरील कोणत्याही भाग किंवा विभागाच्या संदर्भात विक्री, समजुतीचे ज्ञापन, अदलाबदल, गहाण, तारण, भार, बक्षीसपत्र, विश्वस्त, वारसा, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टा, कुळवहिवाट, देखभाल, सुविधाधिकार, परवाना, मृत्युपत्र, हिस्सा, अभिहस्तांकन, धारणाधिकार, जप्ती, विकास हक्क, मार्गाधिकार, प्रलंबित वाद तत्त्व, आरक्षण, करार, एफएसआय/एफएआर वापर किंवा कोणतीही जबाबदारी किंवा वचनबद्धता किंवा कोणत्याही स्वरूपाची मागणी च्या मार्गे सदर स्थावर मालमता, प्रकल्प, घटक व /वा त्यांचा कोणताही भाग यांच्या संदर्भात कोणतेही आक्षेप, दावे, अधिकार, हक्क, नामाधिकार आणि/किंवा हितसंबंध असल्यास कृपया त्यांनी तसे लिखित स्वरूपात पुरक मूळ दस्तावेजांसह निमस्वाक्षरीकारांना येथे खालील नमूद पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या कालावधीत कळवावे. कसूर केल्यास, ते परित्यागीत, स्वाधीन, अधिग्रहित, सोडून दिल्याचे असल्याचे समजले जातील आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील आणि कोणत्याही पुढील संदर्भाशिवाय नामाधिकार प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

**वरील उल्लेखित परिशिष्ट:**

गाव घोट, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या (१) गट क्र. ३५/१ए, मोजमापित ६,९८० चौरस मीटर्स; (२) गट क्र. ३५/१बी, मोजमापित ३,५०० चौरस मीटर्स; (३) गट क्र. ३५/१सी, मोजमापित ३,५०० चौ. मी. (४) गट क्र. ३६, मोजमापित ४,६०० चौरस मीटर्स; (५) गट क्र. ४३/३/२, मोजमापित ३,७५० चौरस मीटर्स; (६) गट क्र. ५९/१, मोजमापित १,७९० चौरस मीटर्स; (७) गट क्र. ६०/१/२बी, मोजमापित ५,५५० चौरस मीटर्स; (८) गट क्र. ३५/१+२/१(३) मोजमापित ४,७०० चौरस मीटर्स; (९) गट क्र. ३५/१+२/१(३), मोजमापित ४,७०० चौरस मीटर्स; आणि (१०) गट क्र. ३५/१+२/१(४) मोजमापित ४,१५० चौरस मीटर्स, एकूण मोजमापित ४३,२२० चौरस मीटर्स धारक जमिनीचे ते सर्व भाग आणि विभाग वजा गट क्र. ३५/१ए, ३५/१बी, ३५/१सी आणि ३६ मध्ये समाविष्टीत मोजमापित १,६३२.५८५ चौरस मीटर्स आणि गट क्र. ३५/१+२/१(२) आणि ३५/१+२/१(४) मध्ये समाविष्टीत क्षेत्र मोजमापित १,९४२.३०७ चौरस मीटर्स हे पनवेल महानगरपालिकेला सुपूर्द केले.

सही/-
**संकेत सेठिया**
**भागीदार**
अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (अनोमा लीगल)
३रा मजला, ईएमसीए हाऊस,
शहीद भगत सिंग रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
मार्च ०५, २०२४

### KVB Karur Vysya Bank Smart way to bank

ॲसेट रिकव्हरी ब्रांच:-
२७६/२८६, किलाचंद मॅन्शन, काळबादेवी मेन रोड, काळबादेवी, मुंबई, महाराष्ट्र - ४००००२
दूरध्वनी क्र. ७७१०००१९५५,
मेल : headarbmumbai@kvbmail.com

**स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९(१) च्या परंतुकान्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत ही तारण धनको, दी करूर वैश्य बँक लि. कडे गहाण/प्रभारित आहे, जिचा अन्वयिक कब्जा दी करूर वैश्य बँक लि. च्या तारण धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे. ती कर्जदार **श्री. प्रभाकर जेना,** पत्ता येथे फ्लॅट क्र. ५०२, कृष्णा नगर, प्लॉट क्र. १३, सेक्टर २६, तळोजा फेज २, पनवेल, महाराष्ट्र ४०१२०२ यांचेकडून करूर वैश्य बँक लि., तारण धनकोंना थकीत **०९.०२.२०२४ रोजीस रु. ३१,४४,९६६.७० (रुपये एकतीस लाख चव्वेचाळीस हजार नऊशे सहासष्ट आणि सत्तर पैसे मात्र)** सह १०.०२.२०२४ पासून त्यावरील व्याज आणि खर्चच्या वसुलीसाठी **२८.०३.२०२४** रोजी **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

नवीन सर्व्हे क्र. ११७/१बी, जूना सर्व्हे क्र. ११७/१, प्लॉट क्र. ५९, गाव दहिवली तर्फे नीड, कर्जत प., तालुका कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२०१ येथील माग्ना आयकॉन म्हणून ज्ञात इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ब्लॉक क्र. २०२ येथील सर्व ते भाग आणि विभाग, क्षेत्र मोज. ६६३ चौ. फू. बिल्ट अप.
**राखीव किंमत रु. २२,१०,०००/-**
**इअर: रु. २,२१,०००/-**
**बोली वाढविण्याचे मुल्य: रु. ५०,०००/-**

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरिता कृपया आमच्या बँकेची/तारण धनकोंची वेबसाईट म्हणजेच www.kvb.co.in/Property Under Auction आणि तसेच सेवा पुरविठादारची वेब पोर्टल **https://kvbauctiontiger.net** चा संदर्भ घ्यावा. श्री प्रविण कुमार थेवर, ९७२२७७८८२८/६३५२६३४८३४-०७९ ३५०२२१४५/१४९/१८२, मेल आयडी: praveen.thevar@auctiontiger.net

**सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ९(१) अन्वये १५ दिवसांची सांविधिक सूचना**

कर्जदार आणि हमीदार यांना ई-लिलावाच्या तारखेपूर्वी तारखेपर्यंत व्याज आणि अनुषंगिक खर्चासह वरील नमूद थकबाकी चुकती करण्यासाठी याद्वारे अधिकसूचित करण्यात येत आहे, कसूर केल्यास परिशिष्ट मिळकतीचा लिलाव/विक्री करण्यात येईल आणि उर्वरित थकबाकी काही असल्यास व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल.

सही/-
**दिनांक: ०४.०३.२०२४** **प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाण: मुंबई** **दी करूर वैश्य बँक लि.**

### फॉर्म ए
### जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)

**करम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहीतीकरीता**

| | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | करम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | जून २७, २०११ |
| ३ | कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित /नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण | कंपनी निबंधक-मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर | यु४५२००एमएच२०११पीटीसी२१९१२८ |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता | नोंदणीकृत कार्यालय:- दुकान क्र. एल-२६१, खालचा तळ मजला, ड्रिम्स- दि मॉल, एलबीएस मार्गाजवळ, भांडुप, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००७८ |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख | फेब्रुवारी २९, २०२४ (सन्माननीय एनसीटीएलच्या आदेशाची तारीख) (*मार्च ०२, २०२४ रोजीस आयआरपी द्वारे आदेश प्राप्त झाला) |
| ७ | नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख | ऑगस्ट २९, २०२४ |
| ८ | अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | नाव: श्री. अरूण कपूर नों. क्र.: आयबीबीआय/आयपीए-००३/आयपी-एन०००३०/२०१७-१८/१०२३० |
| ९ | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकांचा पत्ता आणि ई-मेल | नोंदणीकृत पत्ता: जी-६०१, आर्मी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, सेक्टर-०९, नेरूळ (पूर्व), नवी मुंबई, महाराष्ट्र - ४००७०६ ईमेल आयडी: arun.kapoor58@yahoo.in |
| १० | अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | प्रक्रिया विशिष्ट पत्ता: अरूण कपूर द्वारे अँकोरा रिझोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, १४१२, १४वा मजला, रिअल टेक पार्क, सेक्टर ३० ए, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. प्रक्रिया विशिष्ट ईमेल आयडी: cirp.karrmipl@ancoraa.com |
| ११ | दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख | मार्च १६, २०२४ |
| १२ | अंतरिम निर्णय व्यावसायिकांनी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास | होमबयर्स |
| १३ | एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | १. अतुल नारायण नाईक (आयबीबीआय/आयपीए-००३/आयसीएआय-एन-०३८५/२०२१-२०२२/१४०११) २. सब्बानी मारूथी (आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०२७५२/२०२२-२०२३/१४२०२) २. अनिल काशी द्रोलिया (आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०२३२७/२०२०-२०२१/१३४८२) |
| १४ | (ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | वेबलिंक: https://ibbi.gov.in/home/downloads प्रत्यक्ष पत्ता: https://ibbi.gov.in/en/insolvency-professional |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण खंडपीठ, मुंबई कोर्ट- II यांनी दिनांकित **फेब्रुवारी २९, २०२४** रोजी तिच्या आदेशा द्वारे **करम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड** च्या कॉर्पोरेट नादारी निर्णय प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला. द्वारे आदेश क्र. सीपी (आयबी) क्र. ६५१/एमबी/२०२३. (आदेश अंतिम निराकरण व्यावसायिकाद्वारे मार्च ०२, २०२४ रोजी प्राप्त झाला.)
**करम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड** च्या धनकोंना याद्वारे अंतरिम निर्णय व्यावसायिकांकडे बाब क्र. १० समोरील पत्त्यावर मार्च १६, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यात येते.
वित्तीय धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे व्यक्तिशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.
**दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.**

सही/-
**अरूण कपूर**
**दिनांक : मार्च ५, २०२४** **करम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडच्या संदर्भात**
**ठिकाण: नवी मुंबई** **अंतिम निराकरण व्यावसायिक**
**आयबीबीआय नों. क्र.** आयबीबीआय/आयपीए-००३/आयपी-एन०००३०/२०१७-१८/१०२३०